स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 15–02–2016** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 4. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 6. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 7. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 8. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 10. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 11. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 12. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 13. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 14. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 15. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 633 :– प्रभाग क्रं. ६४ ब अंतर्गत विविध रस्त्याचे डांबरीकरण लाडीकर ले–आऊट येथे श्री. घोडे व रोकडे यांच्या घरासमोर, उदयनगर येथे श्री. कुसुंबे ते रिंगरोड पर्यंत, उदयनगर येथे डी.ए. ऑटोमोबाईल्स ते सोलव, उदयनगर येथे श्री. गोरे ते महाकुलकर यांचे घरापर्यंत, श्रीनगर येथे श्री. साठवणे ते हनुमान मंदीर पर्यंत, अयोध्यानगर येथे दिनेष सायकल स्टोअर्सच्या मागे भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ६ निविदाकारांपैकी मे. अमृता कंन्स्ट्रक्शन नागपूर यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.४०टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. ५१,६९,८६६ /– रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 634 :– निरुपयोगी विद्युत साहित्य विक्री करण्याकरीता स्थायी समिती ठराव क्र. ३८५, दि. ०६.०१.२०१५ च्या अनुषंगाने में. मंसूर इंटरप्राइजेस यांना दिलेला कार्यादेश क्र. LD/01/172, दि. १२.०३.२०१५ रु.८३,१६,२१८/- त्यांनी कार्यादेशानुसार आवश्यक रकमेचा भरणा न केल्याने तसेच याबाबत दिलेल्या कोणत्याही पत्राचे तसेच कारणे दाखवा नोटिसचे उत्तर न दिल्याने रद्द करुन त्यांची अनामत रक्कम रु. ७८,७२०/- (DCR क्र. १००५ (६/५२), दि. २४.०९.२०१४) जप्त करण्यास तसेच त्यांना नागपूर महानगर पालिकेमध्ये या पुढे निविदेत सहभाग घेण्यास अपात्र ठरविण्याचा निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच त्यांना दिलेल्या कार्यादेशातंर्गत समाविष्ट साहित्याची विक्री करण्याकरीता रु. ४५,२७,९१२/- च्या अपेक्षीत रकमेकरीता फेर निविदा बोलविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 635 :– नागपूर महानगापालिकाच्या विविध इमारतीत / कार्यालयात पारंपारिक पंखे व दिवे (टयुबलाईट व सी.एफ.एल.) काढून त्या ऐवजी ऊर्जा कार्यक्षम पंखे व दिवे (एल.ई.डी.) लावण्याकरीता रु. २५० लक्ष च्या प्रस्तावास MuDSM (म्युनिसीपल डिमांड साईड मॅनेजमेंट) च्या योजने अंतर्गत महाऊर्जा (MEDA) ची तत्वतः (in Principal) मंजूरी प्राप्त झाली आहे. या कार्यक्रमांतर्गत रु. २५० लक्ष च्या खर्चापैकी रु.१२५ लक्ष महाऊर्जा (MEDA) कडून नागपूर महानगरपालिकास अनुदान स्वरुपात उपलब्ध होईल व उर्वरीत रु. १२५ लक्ष चा खर्च नागपूर महानगरपालिकेस करावा लागेल. त्याअनुषंगाने

नागपूर महानगापालिकेच्या विविध इमारतीत/कार्यालयात पारंपारिक पंखे व दिवे (टयुबलाईट - सि.एफ.एल.) काढून त्या ऐवजी ऊर्जा कार्यक्षम पंखे व दिवे (एल.ई.डी.) लावण्याकरीता रु. २५० लक्ष च्या खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा व या राशीपैकी रु. १२५ लक्ष चा खर्च नागपूर महानगरपालिकेने करावयास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 636 :– प्र.क्र.1 अ आणि ब येथील सुगत नगर, कुशी नगर, हुडको कॉलोनी व संत लहनुजी नगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त १ निविदा मे. पी. के. कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५ प्रतिशतने अधिक दराची **रू. ३१,०४,८०३/—** (एकतीस लक्ष चार हजार आठशे तीन रूपये फक्त) रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय राशी **रू. २९९९८१०/—** पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 637 :– प्रभाग क्र. २५—ब येथील टिळकनगर मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी **मे. प्रेमचंद राचुमल** यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा **३.४९ प्रतिशत अधिक** दराची **रू. ३१,०४,५९६/—** दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 638</u>** :— प्रभाग क्र. 14 ब अंतर्गत कुंदनलाल गुप्ता नगर व इतर ठिकाणी सी.सी. पेव्हमेन्टचे तसेच नामदेव नगर येथे रस्त्याचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. पी. के. कंन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटीनंतर प्राकलनिय दर रू. ६९९९५३०/— पेक्षा ३.५% प्रतिशत ने जास्त दराची रू. ७२,४४,५१४/— (बहात्तर लक्ष चौरेचाळीस हजार पाचशे चौदा) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा तसेच अतिरिक्त तरतुद मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 639</u>** :— वार्ड क्र. 1 सुगतनगर येथे विपष्यना केंद्राच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे. उपरोक्त विषयांकित कामाकरिता स्थायी समिती ठराव क्र. 336, दि. 02.12.2008 अन्वये रू. 75,00,217.00 चे प्राकलनास प्रशासकीय व तांत्रीक मंजूरी प्राप्त असून कंत्राटदार मे. जे.बी. कंन्स्ट्रक्शन यांना स्थायी समिती ठराव क्र. 640, दि. 11.02.2009 अन्वये रूपये 65,62,690.00 चे कार्यादेश देण्यात आलेले आहे. (12.50 टक्के कमी दराने) श्री. परमानंद रामटेके यांची आर्किटेक्ट/पी.एम.सी. म्हणून या कामाकरिता नेमणूक करण्यात आलेली आहे.

कंत्राटदारास V$^{th}$ R.A. बिलापर्यंत रू. 63,03,249.00 चे भुगतान करण्यात आलेले आहे. आर्किटेक्ट श्री. परमानंद रामटेके यांनी झालेल्या कामाचे एकूण देयक सादर केलेले आहे. सादर केलेल्या देयकानुसार मंजूर राशीपेक्षा जास्त रकमेचे काम करण्यात आलेले आहे. यामध्ये काही अतिरिक्त बाबी (Extra item) चा सुध्दा समावेश असुन त्याची किंमत रू. 3,47,557.00 आहे. जे मंजूर प्रस्तावात अंतर्भुत नाही. याबाबत श्री. रामटेके यांनी Excess saving statement सादर केलेले आहे. तसेच जास्तीच्या झालेल्या कामाच्या आवश्यकतेबाबत खुलासा सुध्दा सादर केलेला आहे. एकूण काम रू. 82,80,846.00 चे झालेले असून यामध्ये Extra item रूपये 3,47,557.00 चा समावेश आहे. अतिरिक्त बाबी Extra item चे दर सन 2008 — 2009 मनपा व सा.बा. वि. चे दर सुचीवर आधारीत आहे. याबाबत Financial Implication खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | प्राकलन राशी/ प्रशासकीय मान्यता | रू. 75,00,217.00 |
| 2. | कार्यादेश राशी | रू. 65,62,690.00 (12.50 % Below) |
| 3. | 5th R.A.Bill पर्यंत झालेले भुगतान | रू. 63,03,249.00 |
| 4. | एकुण झालेला खर्च (Approved + Extra Item) | रू. 82,80,846.00 |
| 5. | अधिकचा (Excess) झालेला खर्च (2—4) | (—)रू. 17,18,156.00 |

वरील Financial Implication नुसार कार्यादेश राशीपेक्षा रू. 17,18,156.00 चा अधिकचा खर्च झालेला आहे.

मा. मुख्य अभियंता यांनी दिनांक 11.01.2016 ला रू. 3,47,551/— चे अतिरिक्त बाबीस मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच एकूण रू. 82,80,846/— चे प्राकलनास सुधारीत तांत्रिक मंजूरी प्रदान केलेली आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता पूढीलप्रमाणे मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

1) अधिकच्या रू. 82,80,846/— चे प्राकलनास सुधारित प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे.
2) अधिकचा रू. 17,18,156/— च्या खर्चास मंजूरी प्रदान करणे.
3) कंत्राटदार मे. जे. बी. कंस्ट्रक्शन यांना जुन्याच मंजूर दराने (12.5 टक्के कमी) रूपये 17,18,156/— चे कार्यादेश देणे. (अतिरिक्त बाबी प्राकलनिय दराप्रमाणे)

उपरोक्त प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 640:— प्रभाग क्र. 16 शांतीनगर येथे कुत्तेवाले बाबा आश्रमाचे तिर्थक्षेत्र 'क' वर्ग अंतर्गत बांधकाम व नविनीकरण विकास कामे करण्यास्तव रू. ३,४७,८५,५०६/— प्रस्तावात शासन निर्णयानुसार म.न.पा.च्या वित्तीय सहभागाकरिता मंजुरी प्रदान करने तसेच प्रस्तावातील किरकोळ तरतुदी मधुन खर्च भागवुन प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराची स्थायी समितीच्या मान्यतेने नेमणुक करण्याचा प्रश्न तसेच त्याचप्रमाणे तिर्थक्षेत्रातील विकास कामाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्रशासकीय मान्यतेस सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 641:— प्रभाग क्र. 32 ब अंतर्गत स्मॉल फॅक्टरी एरिया येथे हरियाना भवन ते हिंदुस्थान विद्यालय, पगारीया लॉन मागील रस्ता व डी.एन.स्टील ते तेजस स्टील पर्यंत रस्त्याचा विकास करण्याकरिता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. डी.सी.गुरुबक्षाणी यांची 0.65 टक्के अधिक दरांची रु. 47,13,153/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्यासह सन 2015—16 या आर्थिक वर्षात पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 642 :— प्रभाग क्रं. ३७ अ हिवरी नगर येथे वैष्णोदेवी चौक ते माधव किराणा स्टोर्स पर्यंत रस्त्याचे पुन:डांबरीकरण करण्याकरीता प्राप्त निम्नतम निविदाकर मे. कुकेश कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दराची रू. ४९,४७,३४४/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्यासह सन २०१५—१६ या आर्थिक वर्षात पद क्र. ए २२००१३३०८०२ अंतर्गत तरतूद उपलब्ध करून देण्यास प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 643 :— प्रभाग क्र. 18 ब अंतर्गत उमाठेवाडी येथे सिमेंट कॉक्रिट पेव्हमेन्ट रस्त्याचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे. उल्हास इंटरप्राईजेस यांची वाटाघाटी नंतर १.३ टक्के कमी दराची रु. ४९,२५,९५६/— (रुपये एकोणपन्नास लक्ष पंचविस हजार नऊशे छप्पन्न ) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र.६७९ ( A42001470511) अंतर्गत प्रस्तावित असून कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंन्त सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 644 :— प्रभाग क्रं. ६७ ब श्री. हरिनगर येथील सिमेंन्ट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण 18 निविदाकारा पैकी मे. द्वारका कन्स्ट्रक्शन यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा 20 टक्के कमी दराच्या निविदा राशी रु. ५९,३६,६०४ /— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 645</u> :— प्रभाग क्रं. ६७ येथील मानेवाडा घाटाचे सौदर्यीकरण तसेच नगरीकांच्या सुविधाकरीता आवश्यक सी.सी. पेव्हमेंट, संरक्षण भिंत व कव्हर्ड पाथ वे चे बांधकाम करण्याचे कामास्तव निविदा बोलाविली असतो एकुण १० निविदाकारापैकी मे. आर.एस.नायडू यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनिय दरापेक्ष १.११ टक्केने कमी दराची निविदा राशी रु. ६५,१०,७२४/— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 646</u> :— प्रभाग क्रं. ६७ ब मधील शाहू नगर, एकमत नगर येथील नाल्याच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याचे कामास्तव निविदा बोलाविली असतो एकुण १३ निविदाकारापैकी मे. एन.एन. बेलखुडे यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनिय दरापेक्षा २९.९९ टक्केने कमी दराची निविदा राशी रु. १,६१,८३,१४९/— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन २९.९९ टक्के कमी दराची निविदा असल्यामुळे अतिरिक्त सुरक्षा कपात निविदाकाराच्या धावत्या देयकातून वसुल करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**मा. सभापती :** आजच्या सभेत मा. सदस्या सौ. निता राजेंद्र ठाकरे यांची महाराष्ट्र महिला आयोगाच्या सदस्य पदी विदर्भांतून एकमेव स्त्रि उमेदवार म्हणून नियुक्ती झाल्या बद्दल हि स्थियी समिती त्यांचे एकमताने अभिनंदन करते.

<u>ठराव क्रमांक 647</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |